करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - ९१


महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक :साशा/कार्या/ब-५/करोना/प्रतिबंधउपाययोजना/२०२० दिनांक : २२/०३/२०२०

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 25, 30, 33, 34, 41 व कलम 41

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/ आरोग्य 5 दिनांक 13/03/2020

3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम 1897 ची नियमावली दिनांक 14/03/2020

4. साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम 1897

---

**आदेश :-**

शासनाने करोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897, दि. 13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र. 02 कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय क्र.03 नुसार प्रसिद्ध केलेली आहे आणि रायगड जिल्हयाच्या हद्दीमध्ये जिल्हाधिकारी रायगड यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

त्याअर्थी, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा एक भाग म्हणून औद्योगिक, खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक आहे. यासाठी रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना आय.टी व सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरवणा-या आस्थापना या आदेशापासून दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत पुर्णपणे बंद करणत येत आहेत. अशा कंपन्या त्यांचे कर्मचा-यांकडून "घरुन काम" (Work From Home) करुन घेवू शकतील. तथापी, या आदेशामधून खालील आस्थापना यांना वगळण्यात येत आहेत.

1. **भाजीपाला, दुध, पिण्याचे पाणी, खाद्य पदार्थ व इतर जीवनावश्यक वस्तू तयार करणा-या आस्थापना, पॅकेजिंग करणाऱ्या, साठविणाऱ्या आस्थापना/गोदामे, वितरक(Distributors), वाहतूक करणारी वाहने (Transportation), कंपन्याच्या कर्मचारी वर्गाच्या बसेस तसेच त्यांना या कामासाठी सेवा पुरविणा-या आस्थापना.**

Scanned with CamScanner

2. औषधे (Medicine) तयार करणाऱ्या आस्थापना, औषधे निर्माण करण्यासाठी लागणारा कच्च्यामाल(Raw materials) निर्माण करणाऱ्या व इतर उपउत्पादने (By products)निर्माण करणाऱ्या, औषधाची पॅकेजिंग करणाऱ्या आस्थापना, सदर पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या वस्तूंची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, वैद्यकिय संसाधने निर्माण करणाऱ्या व त्यांच्या पॅकेजिंगसाठीची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, औषधे पूरवठा करणारे वितरक (Distributors), औषधांची वाहतूक करणारे वाहने(Transportation)ची आस्थपना. या कंपन्याच्या कर्मचारी वर्गाच्या बसेस.
3. ज्या कंपनीची उत्पादन प्रक्रिया अखंडीत चालू राहणे (Continuous Processing Industry) अनिवार्य आहे, अशी आस्थापना कमीत कमी कर्मचारी वर्ग (कमाल 50 %) यांचेसह चालू ठेवावी. या कंपन्यांच्या कर्मचारी वर्गाच्या बसेस.
4. News Paper Printing Press (वर्तमानपत्र छापखाना).

**असे याद्वारे आदेशित करणेत येत आहे.**

वरील आस्थापना सुरु ठेवत असताना, करोना संसर्गासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना व Standard Operating Procedure चे पालन करण्यात येत असल्याची देखील खातरजमा करण्यात यावी. उदा.

- अशा युनीटमध्ये क्षमतेपेक्षा कमी कामगार संख्या ठेवणेत यावी. तसेच कर्मचा-यांना Alternate बोलवण्याचा अथवा पर्याय Work from Home पर्यायदेखील पडताळून पहावा.
- Social Distancing च्या नियमांचे पालन करण्यात यावे.
- कामगारांसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात याव्यात, यासाठी त्यांना आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करुन देणेत यावी.
- कामाच्या ठिकाणी वैयक्तीक व परिसराची स्वच्छता राखण्याच्या सुचना देण्यात याव्यात.
- एखादया कामगारामध्ये करोना संसर्गाची लक्षणे दिसून आल्यास, तातडीने त्याला नजिकच्या सरकारी दवाखान्यात किंवा रुग्णालयात आवश्यक त्या तपासण्या व उपचारासाठी पाठविण्यात यावे.

सदर आदेशाची अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणींबाबत मॅन्युफॅक्चरिंग असोसिएन्स यांनी संबंधित तहसिलदार यांना कळवावे. व तहसिलदार यांनी या कार्यालयास कळवावे.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा ,अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

**प्रति,**

1. सह संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड
2. कामगार उपायुक्त, पनवेल

Scanned with CamScanner

3. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड
4. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग व महाड

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना माहितीकरीता
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता
3. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीकरीता
4. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता
5. मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई
6. पोलीस अधिक्षक, रायगड
7. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद रायगड
8. आयुक्त, महानगरपालिका पनवेल
9. उपविभागीय अधिकारी (सर्व)
10. तहसिलदार (सर्व)
11. जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांना आवश्यक त्या प्रसिद्धीकरीता.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा ,अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

Scanned with CamScanner